Pune Police

## प्रेस नोट

दि.०३/०८/२०१९

**'पुणे शहर पोलीस व व्हिनस ट्रेडर्स'** स्टेशनरी सुपर स्टोअर यांचे संयुक्त विद्यमानाने पुणे शहर पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पाल्यांसाठी दि.०३/०८/२०१९ रोजी सकाळी ०८.३० ते ११.३० या वेळेत आर.एस.पी.शेड, पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर येथे सह पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र शिसवे यांचे अध्यक्षतेखाली, प्रसिध्द चित्रकार श्री गिरीश चरवड, श्री समिर धर्माधिकारी व पुणे पोलीस पब्लिक स्कुलच्या मुख्याध्यापिका श्रीमती विदया केंगे यांचे प्रमुख उपस्थितीत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

'रंग, रेषा व आकारांच्या माध्यमातून आपली कल्पनाशक्ती कागदावर उतरुन त्यांना कल्पनेचे रंग भरत जवळपास **४०० ते ४५०** पोलीस पाल्यांनी या चित्रकला स्पर्धेत भाग घेतला. रंगाची देवाण घेवाण करत मुलांनी आकर्षक चित्रे रेखाटली.

**''धावपळीच्या जीवनात मुलांनी छंद जोपासले पाहिजे. या स्पर्धेमुळे मुलांच्या कलेला प्रोत्साहन मिळेल व ती मांडण्याची संधी मिळेल''** अशा शब्दात मा. सह पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र शिसवे यांनी स्पर्धक मुलांना मार्गदर्शन केले.

प्रसिध्द चित्रकार श्री गिरीश चरवड यांनी मुलांना मार्गदर्शन करताना **''अंतःकरणातील आशय प्रकट करणे म्हणजे चित्रकला होय. स्पर्धेमुळे विदयार्थ्यांच्या गुणांना वाव मिळतो''** अशा शब्दात मुलांशी संवाद साधला.

प्रमुख तीन गटांमध्ये चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक गटामधून प्रथम तीन क्रमांकाना पारितोषिक म्हणून चित्रकला संच व प्रमाणपत्र देण्यात आले.

स्पर्धेचे परिक्षण प्रसिध्द चित्रकार श्री गिरीश चरवड व पुणे पोलीस पब्लिक स्कुलच्या चित्रकला शिक्षिका श्रीमती शर्मिला गांधी यांनी केले. प्रत्येक गटामधील विजेत्या स्पर्धकांची नावे पुढीलप्रमाणे -

**पहिली ते चौथी** - १) श्वेता पाटील २) जस्वीन चव्हाण ३) अनुश्री गवळी
**पाचवी ते आठवी** - १) अनुष्का गोरे २) आर्या तुपसुंदर ३) शरयू गटटे
**नववी ते दहावी** - १) वेदांत निकाळजे २) सुमित नाइकवडी ३) रक्षदा होळकर

प्रत्येक सहभागी स्पर्धकाला ड्राईंग पेपर, चित्रकला साहित्य, अल्पोपहार व सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

सदर कार्यक्रमाला सह पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र शिसवे, पोलीस उप आयुक्त श्री.वीरेंद्र मिश्र, श्री.संभाजी कदम, श्री.मितेश घट्टे, इतर पोलीस अधिकारी, प्रसिध्द चित्रकार गिरीश चरवड व्हिनस ट्रेडर्स चे श्री. प्रमोद करमचंदानी, श्री सुरेंद्र करमचंदानी व पुणे पोलीस पब्लिक स्कुलच्या मुख्याध्यापिका श्रीमती विदया केंगे उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना श्री.कल्याणराव विधाते,स.पो.आ.मा.सं.वि यांनी**'केवळ जिंकणे महत्वाचे नसून स्पर्धेत सहभागी होणेही तितकेच महत्वाचे आहे.'**असा मौलिक संदेश दिला.


पोलीसआयुक्तालय

